नि.फौ.ख.क्र. ३९/२०१९
(नि. २४)

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नाव – लाडोजी काशिराम पायनाईक
वय सुमारे – ६९ वर्षे, व्यवसाय– शेती
निवासस्थान–आजगाव भोमवाडी, ता.सावंतवाडी, जिल्हा– सिंधुदुर्ग.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती व्ही.व्ही.ठाकूर यांच्यामार्फत सुरु–**

माझ्या घरामध्ये मी स्वतः, माझी पत्नी व दोन मुले असे आम्ही एकत्रीत राहतो. जॉन फर्नांडिस हे आमच्याच गावात दुसऱ्या वाडीत राहतात. घटना कधी घडली काय घडली हे मला माहीत नाही.

**सदर साक्षीदार सरकारी पक्षास सहाय्य करीत नसलेने त्यास सरकारी वकीलांनी उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली ती त्यांना देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की दि. ०७/०९/२०१८ रोजी सकाळी ८.०० वाजता मी माझ्या घरी असताना आमच्या शेजारी राहणारे जॉन फर्नांडिस यांच्या घरामध्ये पोलीसांनी छापा टाकला. हे म्हणणे खरे नाही की मी जॉन फर्नांडिस यांच्या घराजवळ काय झाले आहे हे पाहण्यासाठी गेलो असता तेथे मला शेजारी, गावातील लोक व पोलीस थांबलेले दिसले. हे म्हणणे खरे नाही की जॉन फर्नांडिस यांनी त्यांच्या घरातून एक ठासणीची बंदूक आणून दिली व ती मी पाहिली. हे म्हणणे खरे नाही की मला तेथे समजले की जॉन फर्नांडिस यांनी बंदुकीचा परवाना नसताना त्यांच्याजवळ घरामध्ये बेकायदा ठासणीची बंदूक बाळगली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला ओळखतो व त्यांना सहाय्य करण्यासाठी मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.बी.एन.प्रभू यांचेमार्फत नाकारला.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–
(के.के.पाटील)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.

दिनांक– २०/१२/२०२३